।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २२ वे | रविवार दि ९ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४६ वा


# वाईल्ड कार्ड एंट्री अन् सांगोल्यात राजकीय बनवा-बनवी!!

## नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढाऱ्यांच्या ओठात एक अन् पोटात एक धोरणामुळे कार्यकर्ते आणि इच्छुक हवालदिल

सांगोला : सांगोला नगरपालिकेची सर्वात निवडणूक येत्या २ डिसेंबरला असून या निवडणुकीकरिता सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपापले उमेदवार उभे करून तसेच नगराध्यक्ष पदासाठी देखील आपलाच उमेदवार कसा निवडून येईल या दृष्टीने तयारी केल्याचे दिसून येत आहे, परंतु गेल्या चार दिवसापासून सांगोल्यातील राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार यावरून पडद्याआड अनेक बनवा-बनवी करून,अन् त्यांच्यास ओठात एक पोटात एक धोरणामुळे कार्यकर्ते आणि इच्छुक हवालदिल झाले आहेत.यासर्व प्रकाराने जनतेला पर्यायाने सर्वांनाच गृहीत धरण्याचा प्रकार सुरू असल्याची खात्रीशीर बातमी पुढे येत आहे.

नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सांगोला शहरात विद्यमान आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, माजी आमदार ॲड. शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखे-पाटील या तिघांची ताकत असून त्याचबरोबर काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस,भाजपा,रिपांई,बसपा यांची देखील थोड्या अधिक प्रमाणात ताकद आहे. सांगोल्याची निवडणूक ही प्रमुख तीन नेत्याच्या विचाराच्या कार्यकर्त्यांमध्येच आजपर्यंत लढवली गेलेली आहे.

शेतकरी कामगार पक्षाने स्वबळावर त्यांचा अधिकृत उमेदवार म्हणून ज्येष्ठ नेते दोन वेळा नगराध्यक्ष म्हणून काम केलेले मारुती (आबा) बनकर यांचे नाव पक्षाचे अधिकृत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार म्हणून जाहीर केलेले आहे .



गेल्या निवडणुकीमध्ये ज्यांचा नगराध्यक्ष जनतेतून निवडून आलेला होता त्या माजी आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांनी आपला अधिकृत उमेदवार अधिकृतपणे अद्यापही जाहीर केलेला नाही परंतु आनंदा माने हेच त्यांच्या पक्षाचे अधिकृत उमेदवार असल्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून आहे. परंतु यावर अधिकृतरित्या शहाजीबापू पाटील काहीच बोलत नसल्याने तसेच इतर पक्षांशी आघाडी करताना आनंदा माने माझा उमेदवार अध्यक्षपदाचा असून ज्या पक्षाला-गटाला मान्य आहे, त्या पक्षाबरोबरे-गटाबरोबर आघाडी-युती करण्यास मी तयार आहे असे शहाजीबापू अनेक ठिकाणी बोलल्याचे सांगितले जात आहे.तसेच आनंदा माने हे शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या पक्षाच्या अधिकृत चिन्हावर ही निवडणूक लढवली जाणार असल्यामुळे आनंदा माने यांची उमेदवारी थेट मुंबईतून जाहीर होणार असल्याचेही सांगितले जात आहे, त्यामुळे आनंद माने यांची उमेदवारी शहाजीबापू पाटील यांच्या एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेकडून कधी जाहीर होणार हे अद्याप पर्यंत स्पष्ट झालेले नाही.

माजी आमदार दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी देखील नगराध्यक्ष पदा सहित सर्व नगरसेवक पदाचे देखील उमेदवार देऊन निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले आहे परंतु गेल्या पंधरा-तीन आठवड्यापासून दीपकआबा साळुंखे-पाटील हे भारतीय जनता पार्टीच्या संपर्कात असल्याने ते लवकरच भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करणार असल्याचे सांगितले जात आहे, त्यामुळे दीपकआबा साळुंखे -पाटील हे भाजपच्या वतीने निवडणूक लढणार का? त्यांचा गट भाजपासोबत निवडणूक पूर्व आघाडी करणार? याकडे देखील सांगोला शहरवासीयांचे लक्ष लागून राहिले आहे.

### पडद्या आडच्या घडामोडी...वाईल्ड कार्ड एंट्री

सांगोल्यातील प्रमुख राजकीय पक्षाचे पुढारी त्यांच्या इच्छुकांना व जनतेला देखील गृहीत धरून तिसराच उमेदवार एका मोठया सत्ताधारी राजकीय पक्षांच्या संकल्पनेतून महाआघाडीच्या माध्यमातून नगराध्यक्षपदासाठी वाईल्ड कार्ड एन्ट्रीच्या माध्यमातून आणणार असल्याचीही जोरदार चर्चा चौकाचौकात गल्लोगल्ली सुरू आहे.याकरिता जाणीवपुर्वक सोशल मिडिया व वृत्तपत्रामध्ये बातम्या पसरवण्यात आल्याचेही समजते. विशेष म्हणजे ज्या उमेदवाराची ही चर्चा सुरू आहे त्या उमेदवाराचा सांगोला शहरातील जनतेशी कोणताही थेट संपर्क आजपर्यंत आलेला नसल्याचे बोलले जात आहे. तरी पण केवळ पैशाच्या जीवावरती व जिल्ह्यातील काही नेत्यांच्या व एका मंत्र्याच्या हस्तक्षेपामुळे हा वाईल्ड कार्ड एन्ट्रीवाला उमेदवार नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा महाआघाडीचा उमेदवार आहे अशी देखील मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. केवळ बाप जादयांचा वारसा या एका निकषावरती हा उमेदवार महाआघाडीच्या वतीने असू शकतो असेही बोलले जात आहे,त्यामुळे सांगोला शहरात या वाईल्ड कार्ड एन्ट्रीच्या उमेदवाराची जोरदार चर्चा आहे. सांगोला शहरातील जनता ही सुज्ञ व सुजान असल्याने ती योग्य व आपली काम करणारा आपला माणूस असणारा व वाटणारा उमेदवारासच नगराध्यक्ष पद म्हणून निवडून देईल असे राजकीय जाणकारांतून यानिमित्ताने बोलले जात आहे.

नगराध्यक्ष व इतर जागासाठी नेमकी कशी आघाडी व युती होईल यावरतीच पुढील सर्व गोष्टी अवलंबून असून त्यामुळे राजकिय नेते आपल्या सोयीनुसार कशाप्रकारे आपल्या भुमिका बदलतील यावरतीच सर्व लढती अवलंबून असून यात प्रामुख्याने काही जण आपली काहीच ताकद नसताना केवळ पैशाच्या व हुजरेगिरीच्या माध्यमातून आपली पोळी भाजून घेण्याच्या तयारीत असल्याने याचा फटका निष्ठावंत व प्रत्यक्ष काम करणाऱ्या उमेदारास व त्याच्या असंख्य कार्यकर्त्यांना बसणार असल्याने यासर्व बाबींचा परिणाम पुढील काही काळ सांगोला शहराच्या राजकारणावर व विकासावर नक्कीच होणार आहे.

सांगोला शहराच्या विकासाच्या दृष्टीने शहरातील भुयारी गटारीचा दुसरा टप्पा पूर्ण होण्यासाठी व त्यानंतर सांगोला शहरातील संपूर्ण रस्त्याचे काँक्रिटीकरण याकरिता मोठ्या प्रमाणात चारशे-पाचशे कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याने सध्या सांगोला नगरपालिकेचा नगराध्यक्ष हा लोकाभिमुख लोकांना आपलासा वाटणारा व राजकीय जाण असलेला तसेच प्रलंबित सांगोला शहरातील कामे पूर्ण करून घेऊन शहराचा सर्वांगीण विकास करणारा असावा अशी रास्त अपेक्षा सांगोला शहरवासीयातून केली जात आहे.

# शेकापचा स्वबळावर नगराध्यक्ष पदासाठी मारुतीआबा बनकर यांच्या नावावर कार्यकर्त्यांकडून शिक्कामोर्तब



सांगोला : आगामी सांगोला नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) कार्यकर्त्यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाने कोणत्याही युतीशिवाय स्वबळावर निवडणूक लढवण्याचा नारा दिला असून, कार्यकर्त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी शेकापचे ज्येष्ठ नेते मारुतीआबा बनकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. परंतु तुमच्या सर्वांच्या मतांचा आदर मी ठेवणार असून माझ्या मनात सुध्दा मारुतीआबांचे नाव आहे असे मत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

सांगोला नगरपालिकेच्या निवडणुकीसंदर्भात सांगोला शहरातील शेकाप कार्यकर्ते व हितचिंतकांची बैठक काल शुक्रवारी सायंकाळी सांगोला शहरातील पक्ष कार्यालयात आयोजीत करण्यात आली होती. यावेळी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख बोलत होते. यावेळी सांगोला शहरातील ११ प्रभागातील अनेक कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी नगराध्यक्ष पदासाठी मारुतीआबा बनकर यांचे नाव सूचवून निवडून आणण्यासाठी आम्ही जीवाचे रान करू, असा विश्वासही अनेकांनी बोलून दाखविला.

स्व.भाई गणपतराव देशमुख यांच्यासोबत अनेक वर्षे काम करणारे प्रामाणिक सहकारी म्हणून मारुतीआबा बनकर हे तालुक्यात परिचीत आहेत. सांगोला तालुक्याच्या राजकारणात मारुतीआबा बनकर यांचे मोठे योगदान आहे. जनसंपर्कामुळे त्यांचा प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरीकांमध्ये मोठा प्रभाव आहे. स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय झाल्यानंतर, सर्व कार्यकर्त्यांनी एकमताने मारुतीआबा बनकर यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. गेल्या काही दिवसांपासून शेकापच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढवावी, असा मतप्रवाह होता. शहर पातळीवर पक्षाची मजबूत बांधणी आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी असल्याने, कोणाशीही हातमिळवणी न करता निवडणुकीला सामोरे गेल्यास निश्चितपणे यश मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. शेकाप कार्यकर्त्यांनी घेतलेल्या या स्वबळाच्या भूमिकेमुळे सांगोला नगरपालिकेचे राजकारण पूर्णपणे बदलणार आहे.

या निर्णयाचा परिणाम इतर पक्षांच्या संभाव्य युती आणि आघाड्यांवर निश्चितपणे होईल. शेकाप जर स्वबळावर उतरला तर, निवडणुकीत चुरस वाढणार असून, मतदारांना एक सक्षम पर्याय उपलब्ध झाला असून त्यामुळे आता इतर राजकीय पक्ष काय भूमिका घेतात, याकडे सांगोलाकरांचे लक्ष लागले आहे. सांगोला नगरपालिका निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाने (शेकाप) स्वबळावर लढण्याचा जो महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, त्याला आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे.

शेकाप कार्यकर्त्यांनी नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचा जो नारा दिला आहे, त्याबद्दल बोलताना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी हा निर्णय मला एकट्याला घेता येणार नसून पक्षातील सर्वांना विश्वासात घेऊन आपण पुढील रणनिती आखूया, असे सांगत कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा जो नारा दिला आहे, तो कार्यकर्त्यांचा आवाज आहे. त्यामुळे आपला स्वबळावरच नारा कायम ठेऊन नगरपालिकेवर आबासाहेबांचा लाल बावटा फडकाविण्यासाठी आजपासून कामाला लागूया, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

नगरपालिकेच्या निवडणुकीची रणनिती निश्चित करण्यासाठी प्रत्येक प्रभागात लवकरच एक शिष्टमंडळ स्थापन करणार आहे. या शिष्टमंडळाकडे शहरातील इच्छुकांनी दोन दिवसात आपापली नावे द्यावीत, त्यानंतर उमेदवारांची निवड आणि प्रचाराची दिशा यावर सखोल चर्चा करून अंतिम निर्णय घेणार असल्याचे डॉ.देशमुख यांनी स्पष्ट केले.

# भारतीय महिलांनी दाखवलं : स्वप्नं जर मनापासून पाहिली, तर सीमा काहीच नाहीत




हॉलीवूडच्या झगमगाटात भारतीय लेकींचं तेज झळकलेलं पाहून प्रत्येक भारतीयाचं हृदय अभिमानाने भरून आलं. ज्या स्वप्नांची पायवाट कधी फक्त स्वप्ननगरीपर्यंत सीमित होती, ती आज वास्तवात उतरताना दिसते आहे. कला, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' आणि साकार केलं ते अधुरं स्वप्न, जे आज प्रत्येक भारतीय डोळ्यात चमकतं आहे. झगमगत्या मंचावर जेव्हा भारतीय महिलांच्या क्रिकेट संघाने विजयी जल्लोष साजरा केला, तेव्हा संपूर्ण भारताने श्वास रोखून तो क्षण अनुभवला. कधी केवळ पुरुषप्रधान खेळ मानला जाणारा क्रिकेट आज स्त्रियांच्या घामाने, संघर्षाने आणि आत्मविश्वासाने नव्या अर्थाने उजळला आहे.

ही केवळ विजयी धाव नव्हती तर ती होती अनेक दशकांच्या मेहनतीची, समाजाच्या शंकेची आणि स्वतःवरच्या न संपणाऱ्या विश्वासाची फळं. 'भारताच्या लेकींनी जग जिंकलं' हे वाक्य आता फक्त एक शीर्षक राहिलेलं नाही, तर ते एक घोषणा बनलं आहे. भारतीय स्त्रीशक्तीच्या अमर पराक्रमाची! मिथक तोडणाऱ्या या खेळाडूंनी दाखवलं की, कसोटी मैदानावर असो की जीवनात, धैर्य आणि चिकाटीचं बॅटिंग केलं तर कोणतीही डावसंख्या जिंकता येते. जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केवळ ट्रॉफीच नाही जिंकली, तर असंख्य मुलींची स्वप्नं साकार केली. जगभरात भारताचं नाव उजळवणाऱ्या या लेकी अभिमान, प्रेरणा आणि संघर्षाचं प्रतीक. वर्ल्ड कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड महिला संघाशिवाय वर्ल्ड कपची फायनल रंगल्याचे पाहायला मिळाले. भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील फायनलसह २५ वर्षानंतर नवा वर्ल्ड चॅम्पियन मिळणार हे आधीच ठरलं होतं. अखेर तिसऱ्या प्रयत्नात भारतीय महिला संघाने वर्ल्ड कप ट्रॉफीचं स्वप्न साकार केले.

नवी मुंबईतील डी.वाय. पाटील स्टेडियमवर रंगलेल्या महिला विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारतीय संघाने दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत पहिली वहिली विश्वचषक स्पर्धा जिंकत इतिहास रचला आहे. शफाली वर्माच्यासह दीप्ती शर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने २९९ धावांचा बचाव करत शेवटी बाजी मारली. २००५ आणि २०१७ मध्ये अधुरं राहिलेल स्वप्न हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघानं स्वप्ननगरीत साकार करून दाखवलं. भारतीय संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिका संघाची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने शतकी खेळी केली. तिने भारतीय संघाचं टेन्शन वाढवलं होते, पण दीप्तीच्या गोलंदाजीवर तिने मोठा फटका खेळला अन् अमनजोत कौरनं तिसऱ्या प्रयत्नात कॅच पूर्ण करत तिसऱ्या प्रयत्नात ट्रॉफी जिंकण्याचा मार्ग मोकळा केला. दक्षिण आफ्रिकेला हरवून महिला टीम इंडिया अजिंक्य झाली आणि शेवटी भारताच्या लेकींनी 'जग जिंकलं' स्वप्ननगरीत अधुरं स्वप्न केले साकार!

२००७ साली प्रदर्शित झालेल्या चक दे! इंडिया या चित्रपटात शाहरुख खाननं साकारलेला कोच कबीर खान हा पात्र खऱ्या आयुष्यातल्या एका घटनेवर आधारित होता. या पात्रामागे प्रेरणा होती मीर रंजन नेगी. भारतीय हॉकीचा माजी गोलकीपर. १९८२ च्या आशियाई स्पर्धेत भारताला पाकिस्तानकडून १-७ असा पराभव पत्करावा लागला होता. त्यावेळी नेगींवर देशद्रोहाचे आरोप झाले, माध्यमांनी आणि जनतेने त्यांच्यावर तीव्र टीका केली. त्यांच्या आयुष्यावर काळोख पसरला. काही वर्षांनी त्यांनी महिला हॉकी संघाच्या प्रशिक्षकपदी जबाबदारी घेतली. त्यांचं काम, समर्पण आणि विश्वास यांच्या जोरावर भारताच्या महिला हॉकी संघाने २००२ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला! याच वास्तवातून चक दे! इंडियाची कथा जन्माला आली. चित्रपटात कबीर खानवर 'देशद्रोही' ठरवण्यात येतो, पण शेवटी तो भारताला जिंकवून आपली ओळख पुनःप्रस्थापित करतो. हेच मीर रंजन नेगींच्या जीवनाचं प्रतिबिंब होतं. त्यावर शाहरुख खान म्हणाला होता हा चित्रपट फक्त हॉकीबद्दल नाही; तो 'सेकंड चान्स' मिळाल्यावर काय करता येतं, हे सांगतो. चक दे! इंडियानं फक्त एक खेळ दाखवला नाही तर त्याने शिकवलं की, अपयशावर मात करून, समाजाच्या शंकेला उत्तर देत, मेहनत आणि एकतेनं देशाचं नाव पुन्हा उजळवता येतं.

भारतीय महिला संघाने टॉस गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात २९८ धावा करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर २९९ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड हिने सेमी फायनलनंतर फायनलमध्येही शतक करत वर्ल्ड रेकॉर्ड रचला. वर्ल्ड कपच्या एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम तिने आपल्या नावे केला. पण शेवटी भारतीय संघाने फायनल बाजी मारत अधुरं स्वप्न साकार केलं. भारतीय महिलांच्या या विजयानं समाजातील जुनी विचारसरणी डळमळवली आहे. आता क्रिकेट हे 'पुरुषांचं खेळणं' नाही, तर प्रत्येक भारतीय मुलीच्या आत्मविश्वासाचं प्रतीक आहे. आज या विजयानं शाळा, गल्ल्या आणि मैदानं नव्या आवाजाने गाजत आहेत. मी सुद्धा खेळेन, मी सुद्धा जिंकेन! हा विजय फक्त खेळाचा नाही तर तो आहे समानतेचा, संघर्षाचा आणि ओळख निर्माण करण्याचा विजय. स्वप्ननगरीत जे कधी अधुरं वाटत होतं, ते आज या भारताच्या लेकींनी पूर्णत्वास नेलं.

-प्रवीण बागडे,नागपूर

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

************

# ज्ञानक्रांतीचा पहिला दिवस : डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन

विद्यार्थी कसा असावा? याचं प्रतीक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कितीही संकटे आली, कितीही अन्याय-अत्याचार झाले तरीही आपलं चारित्र्य न गमवता जिद्द आणि चिकाटीने त्यांना तोंड देणे हे एक सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्याचे लक्षण आणि त्या विद्यार्थी दशेला परिपूर्ण न्याय देतात ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ७ नोव्हेंबर हा दिवस भारतीय समाज जीवनात, विशेषतः विद्यार्थ्यांच्या जगात एक ऐतिहासिक व प्रेरणादायी दिवस म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी प्रवेश दिन हा केवळ एक दिवस नाही, तर ज्ञान, समानता आणि स्वाभिमानाच्या दिशेने उचललेले पहिले पाऊल आहे. ७ नोव्हेंबर १९०० रोजी बाबासाहेबांनी साताऱ्यातील प्रतापसिंग प्राथमिक शाळेत आपला शैक्षणिक प्रवास सुरू केला. शाळेकरिता वळणारी बारक्या भिवाची ती पावलं म्हणजे साधीसुधी नव्हती तर ती एक नव्या युगाची सुरवात होती. त्यावेळी त्यांचे नांव भिवा असे होते. या शाळेच्या रजिस्टरला १९१४ त्या क्रमांकासमोर आजही बाल भिवाची स्वाक्षरी असून हा ऐतिहासिक दस्तऐवज शाळा प्रशासनाने जपून ठेवला आहे. शाळेच्या वर्गाबाहेर बसून शिकणारा विद्यार्थी, पाण्याच्या एका घोटाला तरसलेला विद्यार्थी तर अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठातला सर्वोत्कृष्ट विद्यार्थी हा प्रवास म्हणजे साधासुधा प्रवास नाही बरं कां ! हे टाकीचे घाव सोसल्यानंतर या विद्यार्थ्याने भारतीय संविधानाची मूळ रचना न्याय, सक्त आणि बंधुता या तत्त्वावर कां केली? याचं प्रकर्षाने जाणीव होते.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिन म्हणजे एका अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगांतराची चाहूल म्हटली पाहिजे, कारण बाबासाहेबांचे पाऊल शाळेत पडल्यामुळेच ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे-वंचितांचे उद्धारकर्तेही झाले. एका अशा समाजातून आलेल्या या बालकाने, जिथे शिक्षण म्हणजे केवळ वरच्या जातींचा अधिकार मानला जायचा, तिथे प्रवेश घेऊन इतिहास घडवला. त्या छोट्या कृतीतून एका नव्या युगाचा उदय झाला, ज्ञानक्रांतीचा आरंभ! हा दिवस म्हणजे त्या संघर्षमय प्रवासाच्या पहिल्या पानाचा स्मरणदिन आणि परिवर्तनाची सुरुवात. डॉ. आंबेडकरांनी त्या शाळेच्या दारातून प्रवेश घेतला आणि पुढे शिक्षणाच्या शिखरावर जाऊन संपूर्ण भारताला अंधःकारातून प्रकाशाकडे नेले. डॉ. आंबेडकरांनी जगाला एक अमूल्य मंत्र दिला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. त्यांच्यासाठी शिक्षण हे फक्त पदवी मिळवण्याचं साधन नव्हतं; तर ते स्वातंत्र्याचं आणि आत्मसन्मानाचं शस्त्र होतं. त्यांनी शिक्षणाला सामाजिक न्यायाचं मूलभूत साधन बनवलं. कारण समाजातली विषमता तोडायची असेल, तर ती केवळ कायद्याने नाही तर शिक्षणानेच शक्य आहे.

आजच्या तरुण पिढीने हे स्मरण ठेवणं आवश्यक आहे की, बाबासाहेबांसाठी शिक्षण म्हणजे केवळ करिअर नव्हे, तर चरित्रनिर्मितीचा मार्ग होता. आजच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी प्रवेश दिन फक्त साजरा न करता, त्यामागचा आशय समजून घेणं गरजेचं आहे. शाळेच्या दारात पाऊल टाकणं म्हणजे केवळ शिक्षणात प्रवेश नाही, तर चेतनेच्या प्रवासाची सुरुवात आहे. तर प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला विचारावे की, मी शिक्षण केवळ नोकरीसाठी घेतोय की समाजासाठी काही करणार आहे? मी ज्ञानाचा उपयोग माझ्या आणि इतरांच्या उन्नतीसाठी करतोय का? बाबासाहेबांच्या शिकण्याच्या भुकेला मी जिवंत ठेवतोय का? हे प्रश्नच विद्यार्थी प्रवेश दिन साजरा करण्यामागचं खरं तत्त्वज्ञान आहे.

आज डिजिटल युगात माहितीच्या सागरात आपण विहार करतोय, पण ज्ञानाचा दीप हरवतोय. डॉ. आंबेडकरांचे तत्त्व आजही तेवढेच लागू आहेत. शिकणं म्हणजे प्रश्न विचारणं आणि प्रश्न विचारणं म्हणजे विचारशक्ती जिवंत ठेवणं. आज समाजात पुन्हा अन्याय, असमानता आणि अंधश्रद्धेचं वातावरण वाढत आहे. अशावेळी बाबासाहेबांचं शिक्षणतत्त्व आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन करतात. ७ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की, प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात समाजबदलाची किल्ली आहे. बाबासाहेबांचा शैक्षणिक प्रवास म्हणजे प्रत्येक दीन, दलित, शोषित, उपेक्षित व्यक्तीसाठी प्रेरणेचा झरा आहे. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकं उघडू नयेत, तर मनंही उघडावी. कारण जेव्हा मन शिक्षित होतं, तेव्हाच समाज प्रकाशमान होतो.

बाबासाहेब शाळेत गेल्यामुळेच ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून जगभर गौरव होतो. त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकार ही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली, म्हणूनच बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासला कूस बदलावयास लावणारी क्रांतिकारी घटना ठरली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते. त्यांनी आपला हा विद्या व्यासंग आयुष्याच्या शेवटपर्यंत जपला. आजचा प्रत्येक विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी तयार होणे काळाची गरज आहे. शिक्षण हेच एकमेव उन्नतीचे साधन आहे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या कठोर परिश्रमाची जाण सर्व विद्यार्थ्यांना होण्यासाठी २७ ऑक्टोबर २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खास शासन निर्णय जारी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिन म्हणजे ७ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी विद्यार्थी दिन म्हणून राज्यभर साजरा करण्यात यावा असे निर्देशित केले आहे. तसेच या शासन निर्णयामध्ये विद्यार्थी दिवस या उपक्रमांतर्गत सर्व शाळांमध्ये त्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर विविध कार्यक्रम जसे निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन इत्यादि उपक्रम आयोजित करण्याचे सूचनाही आहेत. त्यामुळे सर्वांनी खूप शिका, विचार करा आणि परिवर्तन घडवा. तुमच्या मेहनतीमुळे आणि समर्पणामुळे तुम्ही मोठे यश मिळवावे, हीच सदिच्छा. सर्वांना विद्यार्थी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

-प्रवीण बागडे, नागपूर

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

************

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-३ रा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला नगरपालिका निवडणूकीसाठी शासकीय यंत्रणा सज्ज; निवडणुकीच्या दृष्टीने सर्वांनी आचारसंहितेचे व नियमांचे पालन करावे : प्रशासनाकडून आवाहन

## सांगोला नगरपालिका निवडणुकीत ११ प्रभागासाठी एकूण ४० मतदान केंद्रे सांगोला येथे अधिकारी, राजकीय प्रतिनिधी व पत्रकार बांधव यांची बैठक संपन्न

## सांगोला नगरपरिषदेपुढील थकबाकी भरण्यासाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात आला असून हा विभाग सुट्टीच्या दिवशीही कार्यरत राहणार



सांगोला : सांगोला शहरामध्ये निवडणुकीचे वातावरण तयार झाले असून नगरपरिषदेची निवडणुक अतिशय पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासन कटीबध्द आहे. निवडणुकीदरम्यान कोणतीही बेकायदेशीर गोष्ट आढळणार नाही यासाठी प्रशासन सक्षमपणे कार्यरत असणार आहे. आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन निवडणुक प्रशासनाकडून निवडणुक निर्णय अधिकारी तहसीलदार संतोष कणसे व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचेकडून करण्यात आले. राज्यातील नगरपरिषद / नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता राज्य निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ जाहीर केला आहे.

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता आचारसंहितेच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी श्री.संतोष कणसे यांच्या अध्यक्षतेखाली अधिकारी, राजकीय प्रतिनिधी व पत्रकार बांधव यांची बैठक गुरूवार दि.०६/११/२०२५ रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह (टाऊन हॉल) येथे संपन्न झाली. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री.सुधीर गवळी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री.सोमनाथ साळुंखे, पोलीस निरीक्षक श्री.विनोद घुगे यांनी निवडणूक विषयक बाबींमार्फत मार्गदर्शन केले. तसेच मोठ्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधी व पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी तहसीलदार संतोष कणसे व सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी नगरपालिका निवडणुकीविषयी सविस्तर माहिती दिली.

सांगोला नगरपालिका निवडणुकीसाठी स्त्री मतदार संख्या १६ हजार ८३८, पुरुष मतदार १६ हजार ८५८ व इतर २ असे मिळून शहरात ३३ हजार ६९८ मतदार आहेत. निवडणुकीसाठी ११ प्रभागासाठी एकूण ४० मतदान केंद्रे निवडली आहेत. एका मतदारास त्यांच्या द्विसदस्यीय प्रभागातील दोन उमेदवारांना तर त्रिसदस्यीय प्रभागातील तीन उमेदवारांना प्रत्येक मत द्यायचे आहे. तर यंदा नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडला जाणार असल्याने त्या उमेदवारालाही मतदारास तिसरे व चौथे मत द्यावे लागणार आहे. सर्व गोष्टींचा विचार करुन ७०० ते ८०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र असणार आहे. कायदा व सुव्यवस्था भंग होणार नाही, याची सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांनी काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे राजकीय मेळावे, जाहीर सभा याबाबतीत आवश्यक त्या परवानग्या घ्याव्यात, असे आवाहन सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचेकडून करण्यात आले.

पोलीस निरीक्षक विनोद घुगे म्हणाले, निवडणुकीच्या काळात कोणावर कारवाई करण्याची वेळ येऊ नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागावे. अधिक गुन्हे असणाऱ्यांवर आम्ही कारवाई करण्यात आहोत. ११ प्रभागांमध्ये २९० दुबार मतदार संख्या.... नगरपालिका निवडणुकीतील उमेदवारांसाठी खर्चाची मर्यादा २ लाख ५० हजार रुपये आहे. तर नगराध्यक्ष पदासाठी खर्चाची मर्यादा ७ लाख ५० हजार इतकी आहे.

सांगोला नगरपालिका निवडणुकीसाठी ११ प्रभागांमध्ये २९० दुबार मतदार संख्या आहे .या मतदारांना दोन प्रभागांपैकी कोणत्याही एका प्रभागात प्रथम मतदान करतेवेळी हमीपत्र देणे बंधनकारक आहे. या मतदारांना एकाच ठिकाणी मतदान करण्याचा अधिकार आहे .नगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारांना प्रचारासाठी २७ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत केवळ चारच दिवस प्रचार सभा घेता येतील तसेच प्रचारही करता येईल. नगरपरिषद निवडणूक प्रचारसभा घेण्यासाठी प्रशासनाने पुढील ठिकाणे निश्चित केली आहेत. – छत्रपती शिवाजी महाराज चौक/ नेहरू चौक, जयभवानी चौक आणि न्यू इंग्लिश स्कूल मैदान, महात्मा फुले चौक हे मोठ्या सभांसाठी कोणतेही एकाच ठिकाणाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. तसेच कॉर्नर सभा घेण्यासाठी खाजगी किंवा शासकीय जागेसाठी संबंधित परवानगी घेणे आवश्यक असेल.

# फॅबटेक मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी २ लाख निधी मंजुर

## बोर्ड ऑफ रिसर्च इन न्यूक्लिअर सायन्स कडून निधीची तरतुद




सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात प्रथमच आंतरराष्ट्रीय शोध निबंध परिषद होणार असुन या परिषदेला बोर्ड ऑफ रिसर्च इन न्यूक्लिअर सायन्स (बीआरएनएस) कडून २ लाख निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी दिली.

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस सांगोला महाविद्यालयात २३ व २४ डिसेंबर रोजी इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्रेक थ्रू टेक्नॉलॉजीज फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषद मध्ये शाश्वततेच्या आव्हानांना तोंड देणेसाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण कल्पना यांची महत्वाची भुमिका स्पष्ट करण्यात येणार आहे. शाश्वत विकासासाठी प्रगत तंत्रज्ञान या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद मध्ये जगभरातील तज्ञ संशोधक सहभागी होणार आहेत. इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ब्रेक थ्रू टेक्नॉलॉजीज फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट या विषयावर फॅबटेक टेक्निकल कॅम्पस सांगोला मध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेला बोर्ड ऑफ रिसर्च इन न्यूक्लिअर सायन्स कडून आर्थिक साहाय्य दोन लाख रूपये मिळाले आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून विविध देशातील तज्ञ संशोधक सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहे. फॅबटेक टेक्निकल कॅम्पस मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी हि आंतरराष्ट्रीय परिषद उपयुक्त ठरणार आहे. देशपातळीवरील संशोधनाची गरज लक्षात घेऊन फॅबटेक टेक्निकल कॅम्पस सांगोला महाविद्यालयाने प्रथमच आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली असुन या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व प्राध्यापकांच्या शाश्वत विकासाचे सक्षमीकरण होणार आहे. शिवाय आंतरराष्ट्रीय परिषद मधुन नवनवीन संशोधकांना प्रेरणा मिळावी हाच हेतु फॅबटेक महाविद्यालयाने डोळ्यासमोर ठेवून आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.

ही परिषद फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा श्रीमती नीलवर्णा बिरासाहेब रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ. अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा. प्राजक्ता रूपनर, प्राचार्य डॉ. रविंद्र शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

# त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त अंबिका देवी मंदिरात रेश्मा दिवटे यांनी साकारली भगवान शंकराची आकर्षक रांगोळी



सांगोला : त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त सांगोला शहरातील अंबिका देवी मंदिरात सौ. रेश्मा प्रशांत दिवटे यांनी भगवान शंकराची अत्यंत आकर्षक आणि कलात्मक रांगोळी काढली.

भगवान शंकराचे उभे रूप दर्शवणारी ही रांगोळी पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. या निमित्ताने मंदिर परिसरात एकूण सहा ते सात उत्कृष्ट रांगोळ्या साकारण्यात आल्या होत्या. त्यामध्ये रेश्मा दिवटे यांच्या रांगोळीने विशेष लक्ष वेधून घेतले. भाविक, महिला आणि युवक वर्ग रांगोळीसमोर फोटोशूटसाठी गर्दी करत होते.

पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर मंदिरात दिव्यांची सजावट, आरती व भजन कार्यक्रम पार पडले. आकर्षक रांगोळ्यांमुळे अंबिका देवी मंदिराचा परिसर अधिकच मंगलमय झाला होता.

# सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक; ४० मतदान केंद्रावर होणार मतदान होणार

सांगोला : २ डिसेंबरला होणाऱ्या सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी ४० मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

प्रभाग १ साठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व जि.प.प्रा.शाळा नायकुडे वस्ती आदी ३ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग २ साठी विद्यामंदीर प्रशाला, विद्यामंदीर प्रशाला, विद्यामंदीर प्रशाला, जि.प.प्रा.शाळा बिलेवाडी आदी ४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ३ साठी जि.प्र.प्रा.शाळा भिमनगर, जि.प्र.प्रा.शाळा भिमनगर व माता बालक उत्कर्ष प्राथमिक विद्यालय आदी ३ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ४ साठी सांस्कृतिक भवन समाजमंदिर, सांस्कृतिक भवन समाजमंदिर, सनगर गल्ली समाज मंदिर व बौध्द विहार आदी ४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ५ साठी जि.प्र.प्रा.शाळा पुजारवाडी, जि.प्र.प्रा.शाळा पुजारवाडी, जि.प्र.प्रा.शाळा पुजारवाडी व जि.प्र.प्रा.शाळा धनगर गल्ली आदी ४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ६ साठी जि.प.प्रा.शाळा चांडोलेवाडी, जि.प.प्रा.शाळा माळवाडी व जि.प.प्रा.शाळा माळवाडी आदी ३ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ७ साठी सह्याद्री इंग्लिश मिडिअम स्कूल, सह्याद्री इंग्लिश मिडिअम स्कूल व सह्याद्री इंग्लिश मिडिअम स्कूल आदी ३ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ८ साठी न्यु इंग्लिश स्कुल, न्यु इंग्लिश स्कुल व न्यु इंग्लिश स्कुल आदी ३ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ९ साठी जि.प्र.प्रा.शाळा भोपळे रोड, जि.प्र.प्रा.शाळा भोपळे रोड, जि.प्र.प्रा.उर्दू शाळा भोपळे रोड व जि.प्र.प्रा.उर्दू शाळा भोपळे रोड खोली क्र.२ :– केंद्र क्र.४ आदी ४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग १० साठी खडतरे गल्ली वाचनालय इमारत , खडतरे गल्ली महिला सभागृह, खडतरे गल्ली महिला सभागृह व कुंभारगल्ली समाज मंदीर आदी ४ मतदान केंद्रे असणार आहेत. प्रभाग ११ साठी सांगोला गुरुकूल, वासूद रोड, सांगोला गुरुकूल, वासूद रोड पश्चिमाभिमुखी खोली क्र.२ केंद्र क्र.२, सांगोला महाविद्यालय, सांगोला महाविद्यालय व सांगोला महाविद्यालय आदी ५ मतदान केंद्रे असणार आहेत.

सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद हे ओबीसी राखीव निश्चित झाले असून सांगोला नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता शहरात ११ प्रभागांमध्ये ही रचना करण्यात आली असून, त्यापैकी पहिल्या १० प्रभागात द्विसदस्यीय तर एका प्रभाग त्रिसदस्यीय असे एकूण २३ सदस्य असणार आहेत. सांगोला नगरपालिका निवडणुकीसाठी शहरात ३३ हजार ६९८ मतदारांची नोंद आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक होणार असल्याचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी सांगितले.

# जेष्ठ सहकारी इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील दिशा ठरवणार-माजी आमदार दिपकआबा

## नगरपालिका निवडणुकीत आबांच्या भूमिकेकडे तालुक्याचे लक्ष



सांगोला : सांगोला शहर आणि परिसरातील अनेक वर्षे सोबत काम करणारे ज्येष्ठ सहकारी, नगरपालिका निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवार आणि महत्त्वाच्या कार्यकर्त्यांशी चर्चा आणि विचार विनिमय करून नगरपालिका निवडणुकीबाबत पुढील दिशा ठरवणार तसेच युती आणि आघाडी बाबतचा निर्णय घेणार असे प्रतिपादन माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले.

सांगोला शहरात पूर्वीपासूनच दिपकआबा गटाचे वर्चस्व असल्याने दिपकआबांच्या भूमिकेकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. गतवेळी पार पडलेल्या सांगोला नगरपरिषद निवडणुकीत सांगोला शहरातील सर्वात मोठा पक्ष किंवा गट म्हणून दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या गटाला यश मिळाले होते. त्यांच्या विचारांचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे दिपकआबा आघाडीबाबत कोणती भूमिका घेतात यावर नगरपालिका निवडणुकीची समीकरणे अवलंबून असणार आहेत.

यावेळी बोलताना माजी आमदार दिपकआबा म्हणाले, गेली ३५ वर्षे राजकारण करत असताना नेहमीच जिवाभावाचे सहकारी आणि कार्यकर्ता केंद्रबिंदू मानून आपण काम केले आहे. प्रत्येकवेळी ज्येष्ठ सहकाऱ्यांचा सल्ला घेऊन कार्यकर्त्यांना विश्वासात व विचारात घेऊनच आपण आपली भूमिका घेतली आहे. त्यामुळे नगरपालिका निवडणुकीतही सांगोला शहर परिसरातील प्रभागनिहाय इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांची बैठक घेऊन त्यांच्याशी चर्चा करू आणि कार्यकर्ते ज्या पद्धतीने निर्णय घेतील त्याप्रमाणे त्यांच्या भावनेचा आदर करूनच सांगोला नगरपालिका निवडणुकीत कोणत्या पक्षासोबत किंवा नेत्यासोबत युती आघाडी करायची याचा निर्णय घेऊ असेही शेवटी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी नमूद केले.

## सांगोला नगरपालिका निवडणुक; ऑनलाईन नामनिर्देशन भरणेकामी आढावा बैठक

सांगोला : सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अध्यक्ष व सदस्य पदासाठी ऑनलाईन नामनिर्देशन भरणेकामी दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह (टाऊन हॉल) येथे आढावा बैठक आयोजीत करण्यात आली आहे. सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीसाठी अध्यक्ष व सदस्य पदासाठी ऑनलाईन नामनिर्देशन भरणेकामी आढावा बैठक निवडणूक निर्णय अधिकारी श्री.सैपन नदाफ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सांगोला नगरपरिषदेसाठी इच्छूक उमेदवारांनी सदर बैठकीस न चुकता उपस्थित रहावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिले.

# १३ डिसेंबर, रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

## सामंजस्य आणि तडजोडीने जीवन सुखी बनवूया, चला आपण लोकन्यायालयाच्या मार्गाने जाऊया

सोलापूर : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन २०२५ सालातील चौथे राष्ट्रीय लोकअदालत दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे.

या लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, बँक वसुली प्रकरणे, कलम १३८ एन. आय. ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी, यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भुसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँक लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरीत्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

एस.एम.एस.द्वारा सदरच्या लोकन्यायालयात ई- चलनाच्या प्रकरणात वाहनधारकांच्या मोबाईलवर नोटीसा पाठविले जात आहेत. सदर चलनानुसार नोटीसमध्ये नमूद लिंकवर ऑनलाइनव्दारे चलनाची रक्कम भरता येवू शकते. तसेच महा-ट्राफिक या ॲपवरसुध्दा सदर रक्कम भरता येवू शकते. या व्यतिरीक्त महाराष्ट्रातील कोणत्याही जवळच्या वाहतूक शाखेमध्ये जावून सदर रक्कम भरता येवू शकते. धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे.

धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपुर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामी पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही. सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, मनोज शर्मा, यांनी केले आहे.

परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही. न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणा-या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते. लोकन्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

# भुयारी मार्ग दुरुस्तीच्या कामासाठी अखेर रेल्वे प्रशासनाकडून तूर्तास स्थगिती

सांगोला : बहुचर्चित सांगोला शहरातील मिरज रेल्वे गेट क्रमांक – ३२ खाली भुयारी मार्ग दुरुस्तीच्या कामासाठी अखेर ' रेल्वे प्रशासनाकडून तूर्तास स्थगिती मिळाली आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे सांगोला मिरज रेल्वे गेट क्रमांक – ३२ भुयारी मार्गा खालून नियमित सर्व प्रकारची वाहतूक सुरू राहणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे व्यापारी नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

सांगोला मिरज रोडवरील रेल्वे गेट क्रमांक –३२ खाली भुयारी मार्गावरील रोड, भिंतीचे कामासह वॉटर ट्रीटमेंटचे काम करण्याकामी १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत या कालावधीत तब्बल दोन महिने बंद राहणार होता. ऐन लग्नसराई , सांगोला नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक काळात बंद राहणार असल्यामुळे व्यापारी नागरिकांच्या दृष्टीने गैरसोयीचे ठरणार होते त्यामुळे भुयारी मार्ग दुरुस्तीचा कालावधी कमी करून कायमस्वरूपी दर्जेदार दुरुस्ती करावी या मागणीसाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांचेसह शहीद जवान बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष अच्युत फुले यांनी रेल्वे प्रशासनाला लेखी निवेदन दिले होते तर यासंदर्भात शहरातील व्यापारी , शालेय विद्यार्थी, नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन अखेर 'पंढरपूर येथील रेल्वेचे सीनियर सेक्शन इंजिनियर यांनी लोकप्रतिनिधी व शहीद जवान बहुउद्देशीय संघटनेच्या निवेदनाची दखल घेऊन सदर भुयारी मार्गाच्या कामास तुर्तास स्थगिती दिली असे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी सांगितले.

## महुद येथे शाळकरी मुलीने ठेवला प्रामाणिकतेचा अनमोल आदर्श



सांगोला : सध्याच्या काळात माणुसकी आणि प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालली असताना कटफळ (ता.सांगोला) शेरेवाडी येथील एका छोट्या शाळकरी मुलीने प्रामाणिकतेचा अनमोल आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

निलेश महाजन हे देहू येथील रहिवासी ते सध्या विभूतवाडी जरे येथे नोकरी करीत आहेत.ते नुकतेच पंढरपूर ते विभुतवाडी प्रवास करत असताना त्यांची ग्रे रंगाची बॅग रस्त्यावर पडली होती.या बॅगमध्ये सुमारे तीन लाख रुपयांच्या मौल्यवान वस्तू होत्या. त्या बॅगेचा पत्ता लागत नसल्याने महाजन सर मोठ्या चिंतेत होते. त्यांनी याबाबत कटफळ येथील आपले मित्र विजय खरात यांना आपली बॅग महूद ते दिघांची दरम्यान हरवली असल्याचे सांगितले. त्यामुळे विजय खरात यांनी आपल्या स्थानिक व्हाट्सअप ग्रुप वरती महूद ते दिघंची दरम्यान माझे मित्राची बॅग हरवली आहे.सापडल्यास आमच्याशी संपर्क साधा.असा मेसेज केला होता. दरम्यान, शेरेवाडी येथील वैष्णवी माणिक खरात पाटील ही चौथी इयत्तेत शिकणारी मुलगी आपल्या घराजवळ खेळत असताना रस्त्याच्या कडेला एक बॅग पडलेली तिला दिसली. उत्सुकतेने तिने बॅग उचलून आपल्या वडिलांना माणिक खरात यांना दिली. बॅग उघडून पाहिल्यावर बॅग मध्ये मौल्यवान वस्तूं असल्याचे लक्षात येताच माणिक खरात यांनी विलंब न लावता ती बॅग ताबडतोब सापडल्याचे विजय खरात यांना सांगितले. व ती बॅग निलेश महाजन यांच्याकडे परत दिली.

आपली बॅग सुरक्षितपणे परत मिळाल्याने महाजन सरांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रू तरळले. त्यांनी वैष्णवीच्या प्रामाणिकतेचे मनापासून कौतुक करत तिचे विशेष अभिनंदन केले.या घटनेने संपूर्ण परिसरात वैष्णवी आणि तिचे वडील माणिक खरात यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.एका लहान मुलीने दाखवलेला हा प्रामाणिकतेचा झगमगता प्रकाश समाजातील सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## श्री विठ्ठल मल्टीस्टेटच्या सीएफओ सरस्वती पंडित डी.सी.बी.एम. परीक्षा उत्तीर्ण



सांगोला : श्री. विठ्ठल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी सांगोला येथे कार्यरत असणाऱ्या सरस्वती पंडित मॅडम यांनी सहकार क्षेत्रात आवश्यक असणारी डिप्लोमा इन को-ऑपरेटिव्ह बिझनेस मॅनेजमेंट ही पदवी विशेष प्राविण्यसह प्राप्त केली आहे. सदर परीक्षेसाठी देशभरातून को-ऑपरेटिव्ह सेक्टर मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात श्री. विठ्ठल मल्टीस्टेट कडून सोलापूर जिल्ह्यातून एकमेव व्यक्ती उत्तीर्ण झाली आहे. सदरची परीक्षा केंद्रीय सहकार विभाग यांचेवतीने वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट पुणे येथे घेण्यात आली होती. या प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण एक वर्षाचा होता. सदर परीक्षा लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीन विभागात विभागली गेली होती. श्री. विठ्ठल मल्टीस्टेट नेहमीच विविध प्रकारच्या आकर्षक योजना, सर्वोत्कृष्ट बँकिंग याद्वारे प्रसिद्ध आहेच. पण कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करून संस्थेची गुणवत्ता वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्नशील असते. त्यांच्या या यशाबद्दल श्री. विठ्ठल मल्टीस्टेट चे सर्व कर्मचारी व चेअरमन यांच्याकडून त्यांचा सत्कार करण्यात आला व भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांना कर्तव्यदक्ष संस्थापक व चेअरमन दीपक बंदरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता